नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/०१/२०२३ (मंगळवार) सायंकाळ**

---

## राष्ट्रीय महामार्गावर जबरी चोरी करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीच्या सदस्य जेरबंद

### (मारुती स्विफ्ट कार व मोबाईल फोन सुमारे ५,८०,०००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त, स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही)

सोलापूर जिल्हयातील सांगोला येथील हरवटवाडी गावाचे रहीवाशी श्री विक्रम मधुकर इंगोले, हे त्यांचे नातेवाईक व मित्रासोबत नाशिक वरुन रायपूरला जाण्यासाठी मारुती ब्रेझा कारने निघाले. प्रवासादरम्यान दि. ०७/०१/२०२३ रोजी मध्यरात्री १२.२५ वाजताचे सुमारास त्यांचे वाहन पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत येणारा राष्ट्रीय महामार्ग क्र. ५३ वरील मौजा बोरगांव येथे ४ अनोळखी इसमांनी थांबवून त्यांचे वाहनावर लाकडी दांडे व लोखंडी रॉडने हल्ला केला. या घटनेमध्ये त्या चारही अनोळखी इसमांनी श्री विक्रम इंगोले व त्यांचे मित्रांना जबर मारहान केली व त्यांचे जवळील मोबाईल फोन रोख १३,०००/— रुपये आणि ब्रेझा कार जबरीने हिसकावून पळून गेले. सदर घटनेबाबत पोलीस स्टेशन मौदा येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. घटनेचे गांभीर्य बघता नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विशााल आनंद यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे यांचे नेतृत्वात आरोपीतांचा शोध घेण्याकरीता विशेष पथक तयार केले.

सदर विशेष पथकाने सदर गुन्हयाचा समांतर तपास सुरु केला. तपासा दरम्यान विशेष पथकास माहिती मिळाली की, संशयीत आरोपीतांनी गुन्हा करतेवेळी लाल रंगाची स्विफ्ट कार वापरलेली होती व त्या कारचे डॅशबोर्डवर **'लाफ्टींग बुदधाची मुर्ती'** बसविलेली होती असा महत्वपुर्ण सुगावा त्यांचे हाती लागला. याच दुष्टीने तपास करीत असतांना संशयीत लाल रंगाचे कारबाबत नागपूर ग्रामीण जिल्हयातील तसेच जिल्हयाचे सिमेंवरील टोल नाक्यांचे सि.सि.टि.व्ही. फुटेज तपासून माहिती घेतली. यादरम्यान संशयीत वाहनाचे चालकाची माहिति मिळाली कि, या घटनेमध्ये आनंद मार्टीन नावाच्या इसमाचा असल्याचे समोर आले. आनंद मार्टीन हा केरळ व कर्नाटक राज्यात वास्तव्यास असल्याची माहिती मिळून आली. त्यानुसार केरळ व कर्नाटक राज्यातील काही भागात आरोपीचा शोध घेण्यात आला.

दि. १६/०१/२०२३ रोजी आरोपी हा केरळ राज्यातील वायनाड जिल्यामधील सुलथान बाथेरी या गावी आल्याची खबर मिळाल्याने विशेष पथकाने सुलथान बाथेरी येथे जावून आरोपीचा शोध घेतला व त्याला ताब्यात घेतले. सदर गुन्हा आरोपी आनंद मार्टीन वय २५ वर्ष, रा. मनप्लकल हाऊस, थिरुनेल्ली, सुलथान बाथेरी, पोस्ट कुपाडी, जि. वायनाड (केरळ) याने त्याचा साथीदार संतोष टि चंद्रन वय अं. ३० वर्ष रा. मुंडूर जि. पलकड (केरला) याचेसह व आनखी इतर साथीदारांसह केल्याची माहिती दिली. सदर गुन्हयात आरोपीने वापरलेले मारोती स्विफ्ट कार व मोबाईल फोन असा एकुण ५,८०,०००/— रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपीस पुढील तपासकामी पोलीस स्टेशन मौदा यांचे स्वाधीन करण्यात आले.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद व अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखालेयांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, सहा. पोलीस निरीक्षक, अनिल राऊत, जितेंद्र वैरागडे, राजीव कर्मलवार, आशिषसिंग ठाकूर, पोलीस हवालदार ज्ञानेश्वर राऊत, विनोद काळे, गजेन्द्र चौधरी, मिलींद नांदुरकर, इकबाल शेख, अरविंद भगत, रोशन काळे, पोलीस नायक आशिष मुंगळे, उमेश फुलबेल, किशोर वानखेडे, रोहन डाखोरे, विरेन्द्र नरड, विपीन गायधने, बालाजी साखरे, सायबर सेलचे नायक सतिष राठोड, संगिता वाघमारे आणि चालक पोलीस हवालदार अमोल कुथे, पोलीस शिपाई मुकेश शुक्ला, आशुतोष लांजेवार यांनी पार पाडली.



<u>अटक आरोपीसह स्थानिक गुन्हे शाखा नाग्रा. येथील अधिकारी व कर्मचारी</u>

## <u>खुन करणाऱ्या आरोपीला अटक</u>

<u>पो.स्टे. खापा</u>:— दिनांक १४/०१/२०२३ रोजी फिर्यादी नामे— जितेंद्र माणिक कोचे, वय ३० वर्ष, रा. कोटलबर्री ता छिंदवाडा (म.प्र) यांनी पोलीस स्टेशन खापा येथे दिलेल्या रीपोर्ट वरून फिर्यादी हे मजुरीचे काम करत असुन फिर्यादीला चार बहिणी असुन तिसऱ्या नंबरची बहिण **मृतक नामे—सौ. शोभा अशोक कराडे, वय ३७ वर्षे, रा. सुरेवाणी** ही असुन ती सुरेवाणी गावात आपल्या सासु सासरे व पतीसोबत राहत असुन शेतीचे काम करत होती. अंदाजे दिड महिन्या पुर्वी त्यांचे सुरेवानी शिवारातील तलावा काठी वाघाची शिकार झाली होती त्या प्रकरणात वनविभागाने  फिर्यादीचा जावई नामे— अशोक कराडे आणि त्यांचे गावातील देवराव मडावी, रूशि साहरे तसेच चोरखैरी येथील नितेश वागधरे यांना अटक केली असुन सध्या ते जेल मध्ये आहेत. जवाई जेल मधे गेल्यापासून फिर्यादीची बहीण शोभा हीच शेतीचे काम पाहत होती.

दिनांक १३/०१/२०२३ रोजी फिर्यादी हे गावात हजर असतांना दुपारी ०३.३० वा. सुमारास सूरेवाणी येथील देवेन्द्र कोचे यांनी फोन करुन सांगीतले की, “तुझी बहिण शोभा हिचे डोक्याला भयंकर मार लागला आहे तुम्ही लवकर या आम्ही हॉस्पीटलला तिला नेत आहो.” त्यानंतर लगेच फिर्यादी त्यांचे संपर्कात राहुन नागपुर येथील मेयो हॉस्पीटल नागपुर येथे जाऊन पाहीले असता फिर्यादीची बहिण शोभा हिचा आयसीयु मधे उपचार सुरु होता व ती बेशुध्दावस्थेत होती व तिचे डोक्याला भयंकर मार लागला होता. त्यानंतर दिनांक १४/०१/२०२३ रोजी फिर्यादी हॉस्पीटल मधुन सुरेवाणी गावात आले व त्यानंतर फिर्यादीचे बहिणीने ठेक्याने केलेल्या सुरेवाणी शिवारात घटना घडलेल्या शेतात जाऊन पाहीले असता शेतात परहाटीचे पिक व तुरीचे पिक असुन तुरीचे उंच झाडाजवळच एकाच ठिकाणी भरपुर रक्त पडेलेले होते त्यावरुन फिर्यादीला घातपाताचा संशय आल्याने त्याच परिसरात माहीती काढली तेंव्हा देविदास नंदेश्वर या लगतचे कास्तकाराने सांगीतले की सुरेवाणी येथील आरोपी नामे— आबु उर्फ दिनेश उईके,

वय अंदाजे २१ वर्षे हा दुंपारी ०२.०० वा सुमारास फिर्यादीचे बहिणीचे शेताकडे गेला होता यावरुनच आबु उर्फ दिनेश उईके याने दिनांक १३/०१/२०२३ चे दुपारी ०२.०० वा. सुमारास फिर्यादीची बहिण सौ. शोभाबाई कराडे ही शेतात तुरीचे झाडाजवळ एकटी बसली असतांना शेतात येऊन त्याने उंच तुरीचे झाडांमध्ये आपण दिसणार नाही याचा फायदा घेऊन सौ. शोभाबाई कराडे हीला कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन कोणत्यातरी धारदार व जाड हत्याराने तिचे डोक्यावर वार करुन गंभीर जख्मी करुन जिव घेण्याचा प्रयत्न केला. बहिन सौ. शोभा कराडे हिचा उपचार सध्या मेयो हॉस्पीटल नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान जखमी सौ शोभा कराडे हि दिनांक १६/०१/२०२३ चे ०२.१५ वा उपचारा दरम्याण मरण पावल्याचे वैद्यकीय अधिकारी यांनी घोषीत केले. सदर गुन्हयात जखमी महीला ही मरण पावल्याने सदर गुन्हयात कलम ३०२ भादवी अन्वये कलम वाढ करण्यात आली आहे. पुढील तपास हा पोलीस स्टेशन खापा येथील ठाणेदार श्री. अजय मानकर ठाणेदार खापा  मो. नं. ९४२२९४२७६४ हे करीत आहे.

## दुखापत

**१) पो.स्टे. कोंढाळी** :– अंतर्गत ३५ कि.मी. अंतरावरील मौजा आगरगाव तांडा येथे दिनांक १५/०१/२०२३ चे ०८. ०० वा. सुमारास फिर्यादी नामे– दिलीप पतीराम जाधव, वय ३६ वर्ष, रा. आगरगावतांडा ता. हिंगणा जि. नागपुर हा त्याचे मुलीला बोलविण्या करीता आरोपी नामे– अशोक पतीराम जाधव, रा. माडवातांडा (भिवापुर) याचे घरी गेला व तिला घेऊन आपले घरी परत जात असता यातील आरोपीने फिर्यादीला विनाकारण शिवीगाळ केली तसेच बाहेर पडलेल्या लाकडी काठीने फिर्यादीला मारून जखमी केले. तसेच शिवीगाळ करून पाहुन घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार बाबुलाल राठोड ब. नं. ६२१ पोस्टे कोंढाळी मो. नं. ८८३०७९६३७८ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कुही** :– अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील मौजा सिल्ली येथे दिनांक १६/०१/२०२३ चे सकाळी ०९.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– चाणदास नथ्थुजी पडोळे, वय २७ वर्ष, रा. सिल्ली ता. कुही जि. नागपुर हा चहा पिवुन जात असतांना आरोपी क्र. १) संजय शिवाजी लांजेवार वय ३१ वर्ष व २) अतुल भिवाजी लांजेवार वय २७ वर्ष दोन्ही रा. सिल्ली यांनी सिल्ली येथील मरेखट जवळ आडवे होवुन शिवीगाळ करून ''आमचे पैसे काढुन दे नाहीतर तुला व तुझे परीवाराला जिवंत मारीन'' असे म्हणुन आरोपी क्र १) याने गालावर जोरदार थापडा मारल्या व आरोपी क्र २) याने फिर्यादीचे हातात असलेली काठीने फिर्यादीचे पाठीवर व मानेवर मारहाण केली. जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३४१, ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार नामदेव पुजारी ब. नं. ३१९ मो. नं. ७७७५८११६१९ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत १५ कि.मी. अंतरावरील मौजा कान्हादेवी येथे दिनांक १५/०१/२०२३ चे २०.४५ वा. सुमारास यातील आरोपी नामे– अजित गमेश नेवारे, वय २४ वर्ष, रा. कान्हादेवी ता. पारशिवनी हा दारू पिण्याचे सवयीचा असुन घटना वेळी व ठिकाणी आरोपी हा नेहमी प्रमाणे दारू पिवुन आला व फिर्यादी नामे– सत्यपाल गमेश नेवारे, वय २९ वर्ष, रा. कान्हादेवी ता. पारशिवनी याचे आई–वडिलांसोबत घरगुती कारणावरून झगडा–भांडण करीत असता फिर्यादी हे भांडण सोडविण्यास मधात गेले असता ''तु मधात येवु नको'' असे म्हणुन आरोपीने फिर्यादीची गच्ची पकडुन घराबाहेर काढले, व घरासमोर ठेवलेली विट उचलुन फिर्यादीचे डोक्यावर मारून फिर्यादीस जखमी केले व शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार झोड ब. नं १६६५ पोस्टे पारशिवनी मो. क्र. ८८०६३५३४४६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**